सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ८४ | सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## शाब्बास पोरांनो...! भारताने पाकिस्तानला लोळवले

### आयुष म्हात्रेच्या टीम इंडियाचा आशिया कप अंडर १९ स्पर्धेत दणदणीत विजय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताने पाकिस्तानला आशिया कप अंडर १९ स्पर्धेत पराभूत केले आहे. कॅप्टन आयुष म्हात्रेच्या टीम इंडियाने ही कमाल करुन दाखविली आहे. आशिया कप अंडर १९ स्पर्धा सध्या दुबईच्या आयसीसी क्रिकेट अकादमीत सुरु आहेत. भारताने या सामन्यात पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळविला आहे. भारताने प्रथम फलंदाजी करताना २४० धावा केल्या होत्या. पाकिस्तानचा संघ या धावसंख्येचा पाठलाग करु शकला नाही. पाकिस्तानचा संघ १५० धावांवर बाद झाल्याने भारताने ही मॅच ९० धावांनी जिंकली.

भारताने प्रथम फलंदाजी करताना २४० धावा केल्या होत्या. भारताच्या अरोन जॉर्ज, आयुष म्हात्रे, कनिष्क चौहान यांच्या दमदार फलंदाजीमुळं भारतानं ४६. १ ओव्हरमध्ये २४० धावा केल्या. यानंतर भारताच्या दीपेश देवेंद्रन आणि कनिष्क चौहान यांनी प्रत्येकी तीन- तीन विकेट घेत पाकिस्तानला धक्के दिले. भारताचा सलामीवर वैभव सूर्यवंशीने पाकिस्तानचा कॅप्टन फरहान युसूफ याला २३ धावांवर बाद करत महत्त्वाचे यश मिळवून दिले. वैभव सूर्यवंशी फलंदाजीत अपयशी ठरला असला तरी



पाकिस्तानची महत्त्वाची विकेट त्याने घेतली. भारताच्या दीपेश देवेंद्रन याने ३ विकेट, कनिष्क चौहान याने ३ विकेट, किशन सिंग याने २ विकेट, खिलान पटेल याने १ विकेट आणि वैभव सूर्यवंशीने १ विकेट घेतली.

पाकिस्तानकडून कॅप्टन फरहान युसूफ २३ धावा, हझिफा अहसन याने ७० धावा केल्या. पाकचा सलामीवीर अस्मान खान याने १६ धावा केल्या. या तिघांशिवाय पाकिस्तानचे इतर फलंदाज दोन आकडी धावसंख्या देखील करु शकले नाहीत.

**अरोन जॉर्जची दमदार फलंदाजी**

आयुष म्हात्रेने ३८ धावा केल्या. तर, अरोन जॉर्ज याने ८५ धावा केल्या. यानंतर कनिष्क चौहान याने ४६ धावांची खेळी केली. अभिग्यानं कुंदू याने २२ धावा केल्या. यामुळे भारताचा संघ २४० धावांपर्यंत पोहोचू शकला.

**कनिष्क चौहान याची अष्टपैलू कामगिरी**

कनिष्क चौहान याने ४६ धावांची खेळी केली. गोलंदाजी करताना त्याने ३ विकेट घेतल्या. यामुळे पाकिस्तानचा संघ १५० धावांवर बाद झाला. दरम्यान, भारताने या विजयासह 'अ' गटात पहिल्या स्थानावर झेप घेतली आहे. भारताने पहिल्या मॅचमध्ये यूएएला पराभूत केले होते. दुसऱ्या मॅचमध्ये पाकिस्तानला पराभूत केले आहे.







(छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

## उघड्या गटारी बनल्या मृत्यूचा सापळा; पालिकेचे दुर्लक्ष

### स्लॅब उखडण्यासह ढापे गायब; मोठ्या प्रमाणावर कचरा, सांडपाण्यामुळे परिसरात दुर्गंधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीसमोरील मुख्य रस्त्यालगत असलेल्या उघड्या गटारी विविध कारणांनी अक्षरशः ' मृत्यूचा सापळा ' बनल्या आहेत. मात्र, पालिका प्रशासनाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याची नागरिकांकडून तक्रार केली जात आहे. या गटारींच्या प्रत्यक्ष पाहणीत अनेक ठिकाणी गटारींवरील स्लॅब उखडले आहेत. तसेच ढापेही गायब झालेले असून, या गटारींमध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा व सांडपाणी साचलेले आहे. त्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी येत असल्याने या गटारींजवळ नागरिकांना उभे राहणेही अवघड बनले आहे. पालिका प्रशासनाने याची गंभीरतेने दखल घेऊन उघड्या गटारींमुळे निर्माण होणाऱ्या विविध समस्या तत्काळ दूर कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अमळनेर शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीसमोरील रस्ता धुळे व जळगाव या दोन जिल्ह्यांना जोडणारा आहे. या रस्त्यावरून रात्रंदिवस वाहतुकीची गजबज सुरू असते. दररोज शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, दुचाकीस्वार व पादचारी जीव मुठीत धरून याच रस्त्यावरून ये-जा करतात. बाजार समितीत धान्य विक्रीसाठी येणारी वाहने, तसेच नागरिकही याच रस्त्यावरून ये-जा करतात. त्यामुळे रात्री अंधारात या गटारी दिसतच नसल्याने तेथे पडून मोठा अपघात घडण्याची शक्यता आहे.

काही ठिकाणी व्यावसायिकांनी या गटारींवर तात्पुरत्या स्वरूपात लाकडी फळ्या टाकलेल्या आहेत. मात्र, त्याही तुटक्या स्थितीत आहेत. उघड्या गटारींमुळे व्यावसायिकांसह नागरिक त्यात काहीही घाण टाकत असतात. त्यामुळे परिसरात दुर्गंधी येत असते. अशी स्थिती असताना पालिका नागरिकांकडून विविध सोयी-सुविधांपोटी करांची वसुली करते. तसेच राज्य शासनाकडूनही शहर विकासासाठी पालिकेस निधी मिळत असतो. मग या करांची, निधीची रक्कम नेमकी जाते कुठे? असा प्रश्न निर्माण होत आहे. उघड्या गटारींवरील स्लॅब, ढापे, कॉँक्रिटीकरण तेथील स्वच्छता वेळीच होणे गरजेचे आहे. अन्यथा शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यताही नागरिकांत वर्तविली जात आहे. काही वर्षांपूर्वी या उघड्या गटारींचीही स्वच्छता वेळीच होत असे. मात्र, काही वर्षांपासून नगरपालिकेवर प्रशासक नियुक्त असल्याने शहरातील विविध विकासकामांना खीळ बसली आहे. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने शहरातील नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत असलेल्या या प्रश्नाची सोडवणूक करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

**खा. शि. मंडळाची निवडणूक**

## दुसऱ्या दिवशी सहा उमेदवारी अर्ज दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खानदेश शिक्षण मंडळाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या दुसऱ्या दिवशी रविवार, दि. १४ डिसेंबर रोजी ६ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. एकूण ५२ अर्जांची विक्री झाली आहे.

अध्यक्षपदासाठी किसन देवराम पाटील, डॉ. रवींद्र काशिनाथ कुळकर्णी व विक्रम बिपिन शहा, तर कार्यकारी मंडळ सदस्यपदासाठी प्रसाद रमेशचंद्र शर्मा, प्रवीण रामलाल जैन व विक्रम बिपिन शहा यांनी अर्ज दाखल केले आहेत. उपाध्यक्ष व विश्वस्त पदासाठी एकही अर्ज दाखल झाला नाही, अशी माहिती निवडणूक उपसमितीचे चेअरमन पंडित चौधरी व खानदेश शिक्षण मंडळाचे चिटणीस प्रा. पराग पाटील यांनी पत्राद्वारे कळविली आहे.

**मतदानासाठी नोटाचाही पर्याय असावा : माहेश्वरी**

खानदेश शिक्षण मंडळ निवडणूकीत मतदानासाठी नोटाचाही पर्याय असावा. जेणेकरून मतदारास कोणताही उमेदवार पसंत नसल्यास तो नोटाला मतदान करू शकेल, अशी मागणी आकाश माहेश्वरी यांनी निवडणूक समितीचे अध्यक्ष व सचिवांना दिले आहे. पत्रात म्हटले आहे, की मतदान पत्रिकेमध्ये नोटाचा पर्याय द्यावा. संचालक पदासाठी कमीत कमी एक व जास्तीत जास्त आठ मत देऊ शकतात. उपाध्यक्ष पदासाठी कमीत- कमी एक मत व जास्तीत दोन मत देऊ शकतात. अध्यक्ष व विश्वस्त या पदासाठी एक मत द्यावयाचे असे फलक ठिकठिकाणी लावण्यात यावे. जेणेकरून सभासद जुन्या पद्धतीने मतदान करणार नाहीत. सभासदांचा अधिकार भंग होणार नाही म्हणून नवीन उमेदवार तीन वर्षापेक्षा जास्त काळ ते या पदावरती राहू शकत नाही. अशी सूचना त्यांना देऊन याबाबत प्रत्येक उमेदवाराकडून स्वयंघोषणापत्र घेण्यात यावे. जेणेकरून पुढची निवडणूक वेळेवर लागेल.

## शाळांच्या वेळांमध्ये होणार बदल

**'हे' वर्ग ऑनलाइन भरणार**

### सर्व सरकारी आणि खासगी शाळांना आदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सध्या संपूर्ण देशभरात कडाक्याची थंडी पडली असून, अनेक ठिकाणी तर लोक अक्षरशः गारठले आहेत. पहाटेच्या थंडीमुळे शाळकरी मुलांनाही कुडकुडत शाळा गाठावी लागत आहेत. एकीकडे थंडीचा पारा वाढत असताना, दुसरीकडे प्रदूषणामुळे हवेची गुणवत्ताही खालावत आहे. दरम्यान याच कारणामुळे शाळांच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय नेमका कोणी आणि कुठे घेतला आहे? जाणून घ्या.



दिल्लीत शनिवार, दि. १३ डिसेंबर रोजी ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन (ग्रॅप) अंतर्गत चौथ्या टप्प्यातील उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे इयत्ता नववी आणि अकरावीवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे वर्ग संमिश्र (हायब्रीड) पद्धतीने घेतले जातील. दिल्ली शिक्षण संचालनालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, राष्ट्रीय राजधानीतील ढासळत्या हवेच्या गुणवत्तेच्या पार्श्वभूमीवर, संबंधित इयत्तांचे वर्ग ऑनलाइन पद्धतीने घेण्याचे निर्देश सर्व शाळांना देण्यात आले आहेत.

राजधानीतील हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्युआय) 'अत्यंत गंभीर' श्रेणीत घसरल्यामुळे, वायू गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाने दिल्लीत तातडीने ग्रॅप ४ लागू केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. १३ डिसेंबर रोजीच्या शिक्षण उपसंचालकांच्या परिपत्रकात म्हटले आहे, की "शिक्षण विभाग, एनडीएमसी, एमसीडी आणि दिल्ली कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या सर्व सरकारी, सरकारी अनुदानित, विनाअनुदानित मान्यताप्राप्त खासगी शाळांच्या मुख्याध्यापकांना इयत्ता नववी आणि अकरावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी शाळांमध्ये 'हायब्रीड मोड'मध्ये, म्हणजेच प्रत्यक्ष आणि ऑनलाइन दोन्ही पद्धतीने (जिथे ऑनलाइन पद्धत शक्य आहे) पुढील आदेशापर्यंत तात्काळ प्रभावाने वर्ग घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत."

त्यात पुढे असेही म्हटले आहे, की जिथे ऑनलाइन शिक्षणाची सोय उपलब्ध आहे, तिथे तो पर्याय निवडण्याचा अधिकार विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांकडे असेल. या परिपत्रकात शाळांच्या मुख्याध्यापकांना ही माहिती विद्यार्थ्यांच्या पालकांपर्यंत तात्काळ पोहोचवण्यास सांगितले आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) आकडेवारीनुसार, शनिवारी सायंकाळी ७ वाजता राजधानीतील हवेचा गुणवत्ता निर्देशांक ४४८ नोंदविला गेला. एक दिवसापूर्वी, २४ तासांची सरासरी एक्युआय नोंद ३४९ होती, जी 'अत्यंत खराब' श्रेणीत येते.

ग्रॅप ४ अंतर्गत, स्टेज ३ चे सर्व निर्बंध कायम राहतील. प्रदूषणाच्या संकटाचा सामना करण्यासाठी अतिरिक्त निर्बंध लागू केले जातील. स्टेज ४ अंतर्गत, अत्यावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या किंवा अत्यावश्यक सेवा पुरवणाऱ्या ट्रक वगळता, इतर सर्व ट्रकच्या दिल्लीतील प्रवेशावर पूर्णपणे बंदी घालण्यात येईल. एलएनजी, सीएनजी, इलेक्ट्रिक आणि बीएस-व्हीआय डिझेल ट्रकना प्रवेशाची परवानगी दिली जाईल.

## अपघातातील जखमीस २२ लाखांची नुकसान भरपाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : जामनेर मार्गावर झालेल्या भीषण अपघातात पाय गमावलेल्या संदीप नारायण वानखेडे (रा. शिरुड, ता. अमळनेर) यांना लोकअदालतीतून २२ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे. कायमस्वरूपी अपंगत्व आल्याने ही नुकसान भरपाई देण्याचा आदेश लोकअदालतीने दिला.

१४ फेब्रुवारी २०२४ रोजी संदीप वानखेडे हे मित्रासोबत दुचाकीने अमळनेरकडे जात होते. समोरून येणाऱ्या भरधाव डंपरने (एमएच १९ झेड ८११५) त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात संदीप वानखेडे व त्यांचा मित्र गंभीर जखमी झाले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने दोघांना उपचारासाठी भुसावळ येथे दाखल केले. अपघातात डंपरचे चाक संदीप वानखेडे यांच्या पायावरून गेल्याने ते गंभीर झाले होते. उपचारादरम्यान शस्त्रक्रिया केल्यानंतर त्यांना कायमचे अपंगत्व आले आहे. उपचारासाठी सुमारे पाच लाख रुपयांचा खर्च झाला होता. या प्रकरणी डंपर चालक अर्जुन श्रावण ठाकरे याच्याविरुद्ध पहूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**मोटार अपघात दावा; लोकअदालतीत तडजोड**

कायमस्वरूपी अपंगत्व आल्याने संदीप वानखेडे यांनी मोटार वाहन कायद्याअंतर्गत मोटार अपघात नुकसानभरपाई प्राधिकरणात ॲड. महेंद्र सोमा चौधरी यांच्यामार्फत दावा दाखल केला. सुनावणीनंतर हा दावा दि. शनिवार, दि. डिसेंबर रोजी लोकअदालतीसमोर ठेवण्यात आला होता. यात उपचार खर्च, अपंगत्वामुळे आयुष्यभर होणारे आर्थिक नुकसान याबाबत सविस्तर बाजू मांडण्यात आली. चर्चेनंतर विमा कंपनी व लोक न्यायालयाच्या पॅनलसमोर तडजोड होऊन २२ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचा आदेश पारित करण्यात आला.

**दीड वर्षात निकाल**

दावा दाखल झाल्यानंतर अवघ्या दीड वर्षात निकाल लागल्याने अर्जदार समाधान व्यक्त करीत आहे. अर्जदारातर्फे ॲड. महेंद्र चौधरी, ॲड. श्रेयस महेंद्र चौधरी, ॲड. हेमंत जाधव, ॲड. सुनील चव्हाण व सहकाऱ्यांनी कामकाज पाहिले. तर युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीतर्फे ॲड. रेखा कोचुरे यांनी बाजू मांडली.

**आजचे अभीष्टचिंतन**



श्री. विनोद राऊळ (नाना)
अध्यक्ष- नाथजोगी समाज, अमळनेर.



श्री. सारंग पाठक
पुरोहित, अमळनेर.



श्री. बापू पारधी
पोलीस , मारवड (अमळनेर.)

**दिनविशेष**
१५ डिसेंबर

- नागपूरकर भोसले यांनी ओरिसाचा ताबा ईस्ट इंडिया कंपनीला दिला
- चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे यांना ऑस्कर प्रदान करण्यात आला.
- बँकॉक येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने कबड्डीमध्ये सलग तिसरे सुवर्णपदक जिंकले.
- स्वामी स्वरुपानंद यांचा जन्म.
- उषा मंगेशकर पार्श्वगायिका व संगीतकार यांचा जन्म.
- गीता फोगट भारतीय महिला कुस्तीगीर यांचा जन्म.
- बैचुंग भुतिया भारतीय फुटबॉलपटू यांचा जन्म.
- छत्रपती शाहूराजे भोसले यांचे निधन.
- सरदार वल्लभभाई पटेल स्वातंत्र्य सेनानी, स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधानमंत्री आणि पहिले गृहमंत्री यांचे निधन.

' हे बायकांचे काम नाही...' म्हणणाऱ्यांना दाखविला दम
पान २ वर...

खाटू शाम यांचे खान्देश कनेक्शन...
पान ४ वर...

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!



# ‘ हे बायकांचे काम नाही... ’ म्हणणाऱ्यांना दाखविला दम

सक्सेस स्टोरी

## आज लाखो रुपयांची कमाई, सर्वजण अवाक

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हिमाचल प्रदेशातील मंडी जिल्ह्यातील सकीना ठाकूर यांनी कमाल करून दाखविली आहे. त्यांनी रूढीवादी विचारसरणीला मागे टाकत ग्रामीण उद्योजकतेचे नवीन उदाहरण उभे केले आहे. इतिहास विषयात मास्टर्स पदवी मिळूनही मंडीमध्ये मिळणाऱ्या दुधाच्या दर्जामुळे नाराज झालेल्या सकीनांनी धाडसी निर्णय घेतला. त्यांनी तुंगल खोऱ्यातील दुर्गम कूण गावात स्वतःचा ‘ सकीना डेअरी फार्म ’ सुरू केला. सव्वालाख रुपयांच्या बचतीतून आणि बँक कर्जातून सुरू झालेला हा उद्योग आज सुमारे दोन लाख रुपये मासिक उत्पन्न (सहकारी समितीसह) देत आहे. त्या ग्रामीण महिलांसाठी आर्थिक स्वातंत्र्याचे प्रतीक बनल्या आहेत. चला, त्यांच्या या यशस्वी प्रवासाबद्दल जाणून घेऊया.



### शिक्षणानंतर घेतलेले धाडसी पाऊल

मंडी येथील वल्लभ गव्हर्नमेंट कॉलेजमधून इतिहासात मास्टर्स केलेल्या सकीना ठाकूर यांच्यासाठी सरकारी नोकरीचा परंपरागत मार्ग सहज उपलब्ध होता. परंतु त्यांनी तो मार्ग स्वीकारण्याऐवजी उद्योजकतेचा मार्ग निवडला. मंडी शहरातील निकृष्ट दर्जाच्या दुधामुळे त्या त्रस्त होत्या. लोकांना उच्च प्रतीचे पौष्टिक दूध उपलब्ध करून देण्याची त्यांची इच्छा होती. फिटनेस, मॉडेलिंग आणि बॉक्सिंगमध्ये रस असलेल्या सकीनांनी कुटुंबाच्या दबावाकडे दुर्लक्ष करून मनाचा आवाज ऐकला. मात्र कूण गावातून असल्यामुळे प्राण्यांसोबत काम करताना त्यांना सुरूवातीला उपहास सहन करावा लागला. अनेकांनी तर एवढेही म्हटले, की “ डेअरी चालवणे म्हणजे शिकलेल्या बायकांचे काम नसते. ” पण स्थानिक डेअरी शेतकरी चिंता देवी आणि यु-ट्यूबवरील माहिती यांच्यापासून प्रेरणा घेत सकीनांनी स्वतःचा डेअरी फार्म उभारण्याचा निर्धार पक्का केला.

### बचत आणि कर्जातून झाली सुरूवात

जुलै २०२४ मध्ये सकीनांनी सव्वालाख रुपयांची बचत आणि ग्रामीण बँकेकडून मिळालेल्या दोन लाख रुपयांच्या कर्जातून सकीना डेअरी फार्मची सुरूवात केली. त्यांनी पंजाबमधील बठिंडा येथे असलेल्या एका प्रतिष्ठित डेअरी फार्ममधून जास्त दूध देणाऱ्या होल्स्टीन फ्रिसियन गायी खरेदी केल्या. या गायी जास्त प्रोटीन आणि फॅट असलेले दूध देण्यासाठी ओळखल्या जातात. एकूण साडेचार लाख रुपयांच्या गुंतवणुकीत त्यांनी आधुनिक शेड बांधले. मिल्किंग मशीन आणि चारा कटर यांसारख्या उपकरणांवरही सुमारे ५० हजार रुपये खर्च केले. आज त्यांच्या फार्ममध्ये १४ एच.एफ. गायी असून त्या दररोज जवळपास ११२ लिटर दूध देतात. याशिवाय गोवरापासून जैविक खत तयार करून त्या पर्यावरणपूरक शेतीतही हातभार लावत आहेत.

### जीवनातला निर्णायक टप्पा

सकीना ठाकूर यांच्या प्रवासात नोव्हेंबर २०२४ हा महत्त्वाचा टप्पा ठरला. त्यांच्या गावात ‘ कूण महिला दुग्ध उत्पादक सहकारी समिती ’ची स्थापना झाली. हिमाचल प्रदेश राज्य दुग्ध उत्पादक संघाच्या मदतीने या समितीला बल्क मिल्क कूलर, एसएनएफ ॲनालायझर आणि संगणकीकृत डेटा व्यवस्थापन यांसारख्या आधुनिक सुविधा मिळाल्या. सकीना या समितीत दूध खरेदी आणि व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. सध्या ही सहकारी समिती कूण, कोट, लंबीडार, द्रुब्बल, त्रैहर आणि महान या गावांतील सुमारे ७० कुटुंबांना फायदा देत आहे आणि सामूहिकपणे सुमारे दोन लाख रुपये मासिक उत्पन्न निर्माण करत आहे.

### बंपर कमाई आणि एक आदर्श व्यक्तिमत्त्व

सकीना एकट्याच आपल्या फार्ममधून सुमारे सव्वा लाख रुपये महिन्याला कमावतात. ज्यामुळे ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे भक्कम उदाहरण तयार झाले आहे. गायीच्या दुधाचा किमान आधारभूत किंमत (एमएसपी) प्रतिलिटर ५१ रुपये करण्यात आल्याने त्या अत्यंत आनंदी आहेत. गुणवत्तेनुसार मिळणाऱ्या ४१ ते ४४ रुपये प्रतिलिटर दरांमुळे त्यांचा आत्मविश्वास आणि उत्पन्न दोन्ही वाढत आहे. गावकरी आता सकीनाच्या प्रयत्नांची स्तुती करत थकत नाहीत. त्या गावासाठी प्रेरणास्थान ठरल्या आहेत. सकीनांनी सिद्ध केले, की दृढनिश्चय, मेहनत आणि योग्य दृष्टिकोन असला की पारंपरिक व्यवसायालाही आधुनिक यशोगाथेत रूपांतरित करता येते.

# अंग्रेज और मुगलों को कर्ज देता था भारत का यह सेठ

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

पैसे के मामले में बैंक भी थे पीछे अंग्रेज और मुगलों को कर्ज देने वाला जगत सेठ था । जगत सेठ का असली नाम सेठ फतेहचंद था । मुहम्मद शाह ने १७२३ में फतेह चंद की अपार संपत्ति और प्रभाव देखकर उसे जगत सेठ यानी दुनिया का सेठ की उपाधि दी ।

अंग्रेजों और मुगलों ने भारत पर कई सालों तक राज किया । भारत पर शासन के दौरान अंग्रेजों और मुगलों ने कई गरीब लोगों और राजाओं को भी लूटा । लेकिन भारत के इतिहास में एक ऐसा कारोबारी परिवार भी हुआ है । जिसकी अमीरी ने मुगल बादशाहों को भी हैरान कर दिया था और अंग्रेजों तक को कर्ज लेकर खड़ा होना पड़ा था । दरअसल यह वही एक सेठ परिवार था, जिसके बारे में कहा जाता है कि जो दुनिया को उधार देता था वह खुद आखिर में कंगाल कैसे हो गया । ऐसे में चलिए आज हम आपको बताते हैं कि भारत का कौन सा सेठ अंग्रेजों और मुगलों को कर्ज देता था और पैसों के मामले में बैंक भी इसके पीछे कैसे थे?






### कौन सा सेठ देता था अंग्रेज और मुगलों को कर्ज?

अंग्रेज और मुगलों को कर्ज देने वाला सेठ जगत सेठ था । जगत सेठ का असली नाम सेठ फतेहचंद था । मुगल बादशाह मुहम्मद शाह ने १७२३ में फतेह चंद की अपार संपत्ति और प्रभाव देखकर उसे जगत सेठ यानी दुनिया का सेठ की उपाधि दी. इसके बाद फतेह चंद का पूरा घराना इसी नाम से जाना गया । कहा जाता है की फतेह चंद अपने समय में दुनिया के सबसे अमीर व्यक्तियों में से एक था । उनकी कुल संपत्ति आज के मूल्य में ८.३ लाख करोड़ रुपये से भी ज्यादा आगे जाती है । वहीं जगत सेठ के मशहूर खानदान की नींव पटना के माणिकचंद ने रखी थी जो १७०० के दशक में व्यापार के लिए ढाका पहुंचे थे । माणिकचंद जैसे ही बंगाल की राजधानी ढाका से मुर्शिदाबाद शिफ्ट हुई वहीं जा बसे । इसके बाद वह जल्द ही नवाबों के विश्वसनीय बैंकर और वित्तीय सलाहकार बन गए । बाद में दिल्ली के बादशाह फर्रूखसियर ने उन्हें नागर सेठ का किताब दिया था । वहीं १७४० में उनके निधन के बाद फतेहचंद ने कारोबार संभाला और उनका घराना नई बुलंदियों पर पहुंच गया ।

### जगत सेठ की दौलत इतनी थी कि इंग्लैंड की अर्थव्यवस्था भी छोटी पड़ जाए

ब्रिटिश सलाहकारों के अनुसार जगत सेठ परिवार की संपत्ति इतनी बड़ी थी कि उनकी तुलना बैंक ऑफ इंग्लैंड से की जाती थी । १७२० के दशक में माना जाता था कि जगत सेठ के पास इंग्लैंड के सभी बैंकों की कुल संपत्ति से ज्यादा पैसा था । वहीं बंगाल सरकार का राजस्व खजाना, सिक्के ढालने का काम और विदेशी मुद्रा लेनदेन सब पर फतेह चंद परिवार का अधिकार था । इसके अलावा ईस्ट इंडिया कंपनी भी जगत सेठ से उधार लेकर चलती थी । जगत सेठ का यह परिवार इतना ताकतवर था कि कहा जाता था चाहें तो गंगा की धारा को सोने चांदी की दीवार बनाकर रोक दें ।

### कहां गायब हो गया फतेहचंद का परिवार?

दरअसल फतेहचंद के बाद उनके पोते महताब चंद ने परिवार की बागडोर संभाली थी । इस दौरान बंगाल में राजनीतिक संघर्ष बढ़ा और जब सिराजुद्दौला नवाब बने तो फतेहचंद परिवार ने अंग्रेजों का साथ दिया । इसका नतीजा १७५७ की प्लासी की लड़ाई हुई और बंगाल पूरी तरह अंग्रेजों के कंट्रोल में चला गया । यही वह मोड था जिसके बाद इस घराने का पतन शुरू हुआ था । अंग्रेजों के नियंत्रण के बाद ईस्ट इंडिया कंपनी ने फतेहचंद के परिवार को कर्ज लौटाने से इनकार कर दिया, परिवार की जमीन और अधिकार भी धीरे-धीरे खत्म होते गए और १८५७ के विद्रोह के बाद यह प्रभाव लगभग समाप्त हो गया । वहीं १९९० के आसपास यह मशहूर परिवार सार्वजनिक जीवन से पूरी तरह गायब हो गया । फतेहचंद के वर्तमान वंशज कहां हैं, यह आज तक किसी को ठीक से पता नहीं है ।

# ऐका गोष्ट बाराची

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

१२/१२/१२/१२/१२

बारा हा जुन्या लोकांचा प्रिय अंक.
मोजण्यासाठी द्वादशमान पद्धती : १२ ची
फूट म्हणजे : १२ इंच.
एक डझन म्हणजे : १२ नग.
वर्षाचे महिने : १२.
नवग्रहांच्या राशी : १२
गुरू, शनी, मंगळ हानिकारक समजले जातात : १२ वे
तप : १२ वर्षांचे.
गुरुगृही अध्ययन : १२ वर्षे.
घड्याळात आकडे : १२
दिवसाचे तास : १२
रात्रीचे तास : १२
मध्यरात्र म्हणजे रात्रीचे : १२
मध्यान्ह म्हणजे दुपारचे : १२
एखादी गोष्ट तुटली-फुटली म्हणजे तिचे वाजले : १२
सकाळच्या बाजारात उरलासुरला माल : १२ च्या भावात काढतात.
पूर्वी मुलीचा विवाह : १२ व्या वर्षी करत.
इंग्लंडमध्ये : १२ पेन्सचा १ शिलिंग
बाळाचे नामकरण : १२ व्या दिवशी केले जाते.
मृत व्यक्तीचे धार्मिक विधीही : १२ दिवसांचे.
बलुतेदार, बारभाई, बारावाटा : सगळे १२
बेरकी माणूस म्हणजे : १२ गावांचे पाणी प्यायलेला.
तसेच कोणाचेही न ऐकणारी रगेल व रंगेल व्यक्तीला : १२ चा आहे, असे म्हणतात.
ज्योतिर्लिंग : १२ आहेत.
श्रीकृष्ण जन्म : रात्री १२
प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्म : दुपारी १२
मराठी भाषेत स्वर : १२
त्याला म्हणतात : बाराखडी
१२ गावांचा मुखीया.
जमिनीचा उतारा : ७/१२ चा.
इंजिनिअरिंग, मेडिकल किंवा इतर कोर्सेससाठी : १२ वी नंतर प्रवेश.
खायापिया कुछ नही, गिलास फोडा बाराना
बारडोलीचा सत्याग्रह पळून गेला : पो‘ बारा ’
पुन्हा पुन्हा -दो‘बारा’
एक गाव : १२ भानगडी
लग्न वऱ्हाडी : ‘ बारा ’ती
अशी आहे ही १२ ची किमया.
शरद पवारांचा जन्म : १२/१२
त्यांचे गाव : बारामती
आणि सर्वांत महत्त्वाचे.
एमएच १२ अर्थात पुणे
असे भन्नाट शोध फक्त आणि फक्त पुणेकर लावू शकतात.
राज्यपालांनी लटकवून ठेवलेल्या आमदारांची संख्या = १२
आता सस्पेंड झालेल्या आमदारांची संख्या = १२
काही लोकांच्या तोंडावर नेहमीच वाजलेले असतात ते पण १२ : कोणालाच दोष देऊन उपयोग नाही.
महिनाही ‘ बारावा ’च आहे.

# हिवाळ्यात आले-लसणाचे लोणचे ठरते फायदेशीर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हिवाळ्यात सर्दी-खोकला आणि इतर इन्फेक्शनपासून बचाव करण्यासाठी लसणाचा आहारात समावेश केला जातो. प्रदूषणामुळे उद्भवणाऱ्या समस्यांवरही लसणाचे सेवन गुणकारी ठरते. आले आणि लसूण एक नैसर्गिक ॲन्टीसेप्टिक आहे. आले आणि लसणाच्या सेवनामुळे अनेक रोग दूर राहतात.

लसूण आणि आल्यामध्ये बिटा कॅरोटीनही आढळून येते. पचनक्रिया सुरळीत करण्यासाठीही आले-लसणाचे सेवन फायदेशीर ठरते. अशातच दररोज आले आणि लसणाचे लोणचे डाएटमध्ये समाविष्ट करणे फायदेशीर ठरते. त्यात आले-लसणाचे लोणचेही तितकेच फायदेशीर ठरते. ते तयार करण्याची पद्धत पुढीलप्रमाणे आहे.



**आले-लसणाचे लोणचे तयार करण्यासाठी साहित्य**

१ किलो सोललेल्या लसणाच्या पाकळ्या, अर्धा किलो आले, ५० ग्रॅम वाटलेली मोहरी, ५० ग्रॅम बडिशेप, २० ग्रॅम हळदीची पावडर, ३० ग्रॅम एक चमचा ओवा, मीठ चवीनुसार, ४० ग्रॅम मिरची पावडर, अर्धा लीटर मोहरीचे तेल

**आले आणि लसणाचे लोणचे तयार करण्याची कृती**

- लसणाच्या पाकळ्या व्यवस्थित सोलून घ्या. आल्याचीही साल काढून त्याचे छोटे तुकडे करून घ्यावे. दोन्ही उन्हामध्ये कमीत कमी २ तासांसाठी सुकवून घ्या.
- एका कढईमध्ये बडिशेप, अर्धा लीटर मोहरीचे तेल एकत्र करून परतून घ्या.
- तेल थंड झाल्यानंतर त्यामध्ये लसूण, आले, मिरची, हळद आणि मीठ व्यवस्थित एकत्र करा.
- आले आणि लसणाचे लोणचे तयार आहे. एखाद्या हवाबंद डब्यात ठेवून द्या.
- लोणचे काच किंवा मातीच्या भांड्यात ठेवू शकता.
- तयार लोणचे तुम्ही ४ किंवा ५ दिवसांनंतर खाऊ शकता.

**लसूण आणि आल्याचे लोणचे खाण्याचे फायदे**

- दररोज या लोणच्याचे सेवन केल्याने हाडे मजबूत होतात. तसेच आजारांपासूनही बचाव होतो. सांधेदुखी आणि सर्दी-खोकला यांसारख्या आजारांपासून बचाव होतो.
- डायबिटीसच्या रुग्णांसाठी आले-लसणाचे लोणचे अत्यंत फायदेशीर ठरते.
- थंडीत ब्लड सर्क्युलेशन उत्तम ठेवण्यासाठी आले-लसणाचे लोणचे अत्यंत फायदेशीर ठरते.
- आले लसणाचे लोणचे हृदयाचे आरोग्य राखण्यासाठीही मदत करते.
- जर तुम्ही फॅटी लिव्हरच्या समस्येने हैराण असाल तर आले-लसणाचे लोणचे फायदेशीर ठरेल.
- दररोज डाएटमध्ये आले-लसणाचे लोणचे खाल्ल्याने रोगप्रतिकारशक्ती मजबूत होते.


# विराट कोहलीचा मास्टरस्ट्रोक, घेतला मोठा निर्णय




ग्लोबल महातेज वृत्तसेवा

टीम इंडियाचा दिग्गज खेळाडू विराट कोहली याने एक मास्टरस्ट्रोक खेळण्याची योजना आखली आहे. त्याने एक मोठा निर्णय घेतला आहे. विराट पुढे काय करणार याची सर्वांनाच उत्सुकता आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध वन-डे सीरिजमध्ये विराट कोहलीची बॅट अक्षरशः तळपली. लागोपाठ शकत झळकावून त्याने धमाकेदार बॅटिंग दाखवली. त्यानंतर आता भारताच्या या स्टार फलंदाजाने एकमोठा निर्णय घेतला आहे. विराटने क्रिकेटच्या मैदानाप्रमाणेच आता बिझनेसच्या मैदानावरही मोठी खेळी खेळण्याचा निर्णय घेतला आहे. कोहलीबद्दल समोर आलेल्या मोठ्या बातमीनुसार विराट हा त्याची वन ८ कंपनी विकणार आहे. काही रिपोर्ट्सनुसार विराट ही कंपनी ॲजिलिटासला विकणार आहे. एवढेच नव्हे तर तो या कंपनीत भागीदारीसाठी खरेदी करण्यासाठी ४० कोटी रुपयांची गुंतवणूक देखील करेल. वन ८ ही ॲजिलिटासने विकत घेतलेली दुसरी कंपनी ठरेल. या आधी त्यांनी मोचिको शूज कंपनी विकत घेतली होती.




### विराटच्या वन ८ ची किंमत किती?

वन ८ ब्रँडचे रेस्टॉरंट तर आहेच, पण यातर्फे लाइफस्टाइल प्रॉडक्टस्ही बनवले जातात. ज्याचे नेटवर्थ ११२ कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. विराट कोहलीचा बालपणीचा मित्र वर्तिक तिहारा आणि मोठा भाऊ विकास कोहली ही कंपनी चालवतात. आता ॲजिलिटास ती (कंपनी) विकत घेणार आहे. यापूर्वी ॲजिलिटासने विकत घेतलेली मोचिको शूज ही कंपनी ॲडिडास, प्यूमा, न्यू बेसन्स, स्केचअप, रीबॉक आणि क्रॉक्ससारख्या कंपन्यांसाठी शूज बनवते. आता विराट कोहली या कंपनीत भागीदार म्हणून सामील होत आहे.

### यशस्वी क्रिकेट आणि बिझनेसमनही

क्रिकेटच्या मैदानावरचा विराटचा कारनामा आपण सर्वांनीच पाहिला आहे. पण विराट हा केवळ एक उत्कृष्ट क्रिकेटपटूच नाही तर एक यशस्वी उद्योजक देखील आहे. त्याची एकूण संपत्ती १००० कोटींपेक्षा जास्त आहे आणि यात त्याच्या व्यवसायाचा मोठा वाटा आहे. विराटने फॅशन, फिटनेस, फूड, टेक आणि क्रीडा क्षेत्रातील १३ हून अधिक व्हेंचर्समध्ये गुंतवणूक केली आहे. तो काही ब्रँड्सचा सह-मालक आहे. वन ८ व्यतिरिक्त, विराटने वरोगन, नुएव्हा आणि चिझल फिटनेसमध्ये गुंतवणूक केली आहे. तसेच एफसी गोवा, युएई रॉयल्स, बेंगळुरू योद्धा अशा स्पोर्टस् टीमचा ते को-ओनरही (सहमालक) आहे. एवढेच नव्हे तर गो डिजीट या इन्शुरन्स कंपनीतही विराटने गुंतवणूक केली आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# पुरोगामी महाराष्ट्रात कोवळ्या मुलींच्या विक्रीचा बाजार

## फक्त ५० ते ८० हजारांत केला जातो दलालांकडून सौदा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पुरोगामी महाराष्ट्राचा डांगोरा पिटणाऱ्या महाराष्ट्रात आतमध्ये काय चालले आहे, याची कल्पना बहुतेक कुणालाच नाही. शाहू, फुले, आंबेडकरांनी ज्या महाराष्ट्राची समाजमनाची पुरोगामित्वाची मशागत केली त्या जमिनीत आता पुन्हा सरंजामीपणाचे पीक येऊ लागले आहे. महाराष्ट्राच्या समाजमनाला हादरवून टाकणारी बातमी नुकतीच जगासमोर आली आहे.

खेळण्या-बागडण्यासह शाळेत जाणाऱ्या वय वर्षे १४ असलेल्या मुलींना चक्क काही हजारांत विकत घेतले जात आहे. अंगावर शहारे आणणारे हे वास्तव पालघर जिल्ह्यातील आहे. या अल्पवयीन मुलींची खरेदी नेमकी कशासाठी केली जात आहे, याचे कारणही तितकेच धक्कादायक आहे. सध्या लग्नासाठी मुलांना मुली मिळत नाहीत. खासगी नोकरी करणाऱ्या तरुणांचेही सहजासहजी लग्न होत नाही. एकतर मुलगा सरकारी नोकरीला हवा किंवा खासगी कंपनीत. त्याचे पॅकेज १५ किंवा २० लाखांचे हवे. हे झाले नोकरीतील तरुणांचे. मात्र, नोकरी नसणाऱ्या तरुणांनी काय करायचे? त्यांची लग्ने कशी व्हायचीत? त्यासाठी काही एजंट पालघरच्या आदिवासी भागात ॲक्टिव्ह आहेत. जे नवरा मुलाकडून लाखो रुपये घेतात आणि तेथील आदिवासी भागातील कुटुंबांना केवळ हजारो रुपये देऊन त्यांच्या मुलींचा सौदा करतात. तुमच्या मुली सुखात संसार करतील. मुलगा नोकरी करतो, अशी आमिषे दाखवून अशिक्षित वाड्या-वस्त्यांवरील आदिवासी कुटुंबांची सर्रास फसवणूक केली जात आहे.

एका माध्यमाला पालघर जिल्ह्यातील वाडा-भिवंडी भागातील आदिवासी पाड्यांवर कोवळ्या मुलींची लग्नासाठी विक्री होत असल्याची माहिती मिळाली. त्याची पडताळणी करण्यासाठी माध्यम प्रतिनिधी आदिवासी भागात पोहोचला असता रस्त्याच्या दुतर्फा गर्द झाडी दिसू लागली होती. मध्ये-मध्ये पाच-दहा झोपड्यांच्या आदिवासींच्या वाड्या दिसू लागल्या. तेथील आदिवासीबहुल परळी गावात पोहोचले. बहुतेक गावाचा बाजार असावा. बाजार मागे सोडून तेथील आदिवासी पाड्यावर गेले. ती झोपडी पीडित मुलीचीच होती. गवताच्या भिंती, गवताचे छप्पर, घरात चार भांडीकुंडी आणि एका बांबूच्या आडव्या काठीवर टाकलेले कपडे, पीडित मुलगी जेमतेम १४ ते १५ वर्षांची असेल. तिच्याजवळ दोन वर्षांची मुलगी होती. पाहणाऱ्या कुणालाही वाटेल पीडित मुलीची ती बहीण असावी. मात्र तसे नव्हते. ती १५ वर्षांची मुलगी त्या चिमुरडीची आई होती. जवळपास तीन वर्षे त्या मुलीने नरकयातना भोगल्या होत्या. ही पीडित मुलगी तिच्या आजीच्या घरी राहायला होती. आई-वडील कायम वीटभट्टीवर कामाच्या निमित्ताने गावापासून दूर होते.

एकदिवस गावातील कोर नावाचा दलाल तिच्या आजीकडे आला. आजीला काहीतरी सांगितले. दरम्यानच्या काळात पीडितेची आजी वारली. तरीही कोर नावाच्या दलालाने तिला घेऊन संगमनेर गाठले. कारण कोरने या मुलीचा सौदा केला होता. हा सौदा केला होता ५० हजारांत. अवघ्या ५० हजारांत या कोवळ्या मुलीची विक्री झालेली होती. पीडित मुलीला याची कल्पनाही नव्हती. आहिल्यानगरच्या संगमनेर गावात पीडित मुलीला घेऊन गेले. आधी हळदी-कुंकू करू, असे सांगितले आणि बेसावधक्षणी लग्न लावून दिले. असाच प्रकार जव्हार तालुक्यातील एका आदिवासी कुटुंबासोबतही घडला आहे. १४ वर्षांच्या नीलम नामक दलालामार्फत जळगावातील सचिन पाटीलसोबत त्र्यंबकेश्वरमध्ये तिचे लग्न लावले. लग्नानंतर नीलम गरोदर राहिली. मात्र, तिच्या सासरच्यांनी गर्भपात करून नीलमला तिच्या माहेरी पाठवून दिले. दरम्यान, या दोन्हीही प्रकरणांत पोलिसांनी संबंधितांवर कारवाई केली असून, चार्जशीट दाखल करून आरोपींसह दलाला बेड्या ठोकल्या आहेत. या दोन्ही घटना उदाहरण असल्या, तरी आदिवासीबहुल या भागातील वाडा, मोखाडा, जव्हार, भिवंडीत अशी अनेक प्रकरणे घडतच आहेत.



## गिग वर्क कल्चरचा जमाना

जग प्रचंड वेगाने बदलत आहे. त्या बदलाचा अनुभव घेत आपण सध्या जगत आहोत. जगासोबत भारत देखील बदलतोय. जगातील पाच मोठ्या अर्थव्यवस्थेत सध्या आपला समावेश आहे. पुढील पाच वर्षांमध्ये जगातल्या तीन मोठ्या अर्थव्यवस्थेत आपला समावेश होईल. कोरोनाने सगळे वर्क कल्चर बदलले आहे. आपल्यातल्या अनेकांना 'वर्क फ्रॉम होम' करायला कोरोनाने भाग पाडले आहे. गेल्या चार वर्षात 'वर्क फ्रॉम होम'चे आता 'फ्रॉम एनिव्हेअर' झाले आहे. कुठुनही आणि कोणासाठीही काम करण्याचा लवचीकपणा एक परिणाम म्हणजे आपण गिग इकॉनॉमीकडे जात आहोत.

गिग इकॉनॉमी किंवा कल्चर म्हणजे अशी कामाची पद्धत जिथे लोक कायमस्वरूपी नोकरीऐवजी तात्पुरता, अल्प मुदतीच्या कामांमध्ये (गिग्स) भाग घेतात. जसे, की फ्रीलान्सींग, कंत्राटी काम किंवा ॲप आधारीत सेवा (उदा उबर, स्वॅगी). जिथे लवचिकता आणि कामाचे स्वातंत्र्य असते. मात्र, नोकरीची सुरक्षितता आणि फायदे कमी असू शकतात. यात डिजीटल प्लॅटफॉर्मचा वापर करून ग्राहक आणि कामगार यांना जोडले जाते. त्यामुळे कामाच्या पारंपरिक पद्धतीत बदल होतो. या संकल्पनेमुळे आयुष्यभरासाठी कायम नोकरी किंवा आयुष्यभरात एकाच वेळी अनेक कामे करावी लागतील. नोकरी एके नोकरी, असे करून चालणार नाही. तशी ही संकल्पना पूर्णपणे नवीन नाही. अनेक क्रिएटीव्ह प्रोजेक्टस्‌मध्ये हे होत असते. एखाद्या चित्रपटाची निर्मिती करताना अनेक लोक एकत्र येतात. तो प्रोजेक्ट पूर्ण झाला, की ती टिम विखुरली जाते. तुम्ही स्वतःची क्षमता दाखवून दिली आणि प्रभाव निर्माण केला तर, तुमची मागणी वाढू शकते. नव्या गिगसाठी तुम्हाला निवडण्यात येऊ शकते. भविष्यातील कामाचे स्वरूप आणि गिग कल्चरमध्ये काम करण्यासाठी पाच प्रमुख कौशल्य महत्वाची आहेत.

**१) सतत शिकत राहा** : चार्ल्स डार्विन म्हणतो, की वेगाने बदलणाऱ्या जगात जे सक्षम आहेत तेच असे नाही, तर जे परिस्थितीशी जुळवून घेतील. तसेच जिवंत आणि टिकून राहतील. त्यासाठी नवी कौशल्ये शिकविण्याशिवाय कुठलाही पर्याय नाही. २) **नेटवर्किंग शिका** : आपण सगळेच एकमेकांशी अनेक अर्थाने जोडले गलेलेया दुनियेत जगत आहोत. त्यामुळे आपले नेटवर्क किती मजबूत आहे, त्यावर आपले यश अवलंबून असते. म्हणून नेटवर्किंग हा आजच्या जगण्यातला अत्यंत महत्वाचे कौशल्य आहे. ३) **आर्थिक व्यवस्थापनाची जाणीव** : सध्या बहुतांश तरूण मंडळी आपल्या पालकांपेक्षा जास्त पैसे कमावतात. गिग वर्क कल्चरमुळे महिन्याचे ठराविक उत्पन्न ही संकल्पना आता बाद होत आहे. प्रोजेक्ट पूर्ण करा आणि पैसे घ्या, असा आता जमाना आला आहे. त्यामुळे वेळेचे आणि पैशांचे व्यवस्थापन करणे खूप महत्वाचे आणि कठीण काम आहे. म्हणून हे कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. ४) **विक्रीचे कौशल्य** : सेल्स म्हणजे विक्री करणे हे आपले नाही, तर दुसऱ्यांचे काम आहे. असे इंजिनिअर्स आणि तंत्रज्ञ यांना वाटते. मात्र, वस्तुस्थिती अशी आहे, की हे कौशल्य प्रत्येकाला आले पाहिजे. सध्याच्या गिग कल्चरमधला अत्यंत गंभीर व आवश्यक असा विषय आहे. ५) **संयम आणि सातत्य** : आयुष्य हे थोड्या अंतरासाठी धावण्यासारखे नाही, तर मॅरेथॉनसारखे आहे. करियर घडवायचे असेल तर दीर्घकाळ प्रयत्न करावेच लागतात. त्यासाठी आवश्यक घटक म्हणजे संयम आणि सातत्य ! सध्याच्या काळात गिग कल्चर ही संकल्पना प्रत्येक क्षेत्रात (आर्थिकशी संबंधीत नोकरी व व्यवसाय) रुजत चालली असल्याचे दिसून येते.

**-शरद आ. सोनवणे**
(९४२०१०८३०५)

## स्वच्छ भारत अभियान कागदावरच; पानखिडकी परिसर बनला कचरा डेपो

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



(छायाचित्र : संजय सोनवणे)

अमळनेर : येथील पालिकेच्या स्वच्छ भारत अभियानाचे फलक आणि जाहिराती शहरात झळकत आहेत. मात्र, अनेक भागांमध्ये अस्वच्छता आहे. पानखिडकी परिसरातील शिलनाथ भजनी मंडळ कार्यालय, जय बजरंग व्यायामशाळा तसेच महिला प्रसाधनगृहाजवळील रहदारीच्या प्रमुख रस्त्यावर साचलेला कचरा पाहता जणू कचरा डेपोच येथे उभारण्यात आल्याचे दिसते.

संतश्री सखाराम महाराज समाधीकडे जाणारा हा रस्ता धार्मिकदृष्ट्या तसेच दैनंदिन वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, या वर्दळीच्या मार्गावर दररोज थेट रस्त्यावर कचरा, प्लास्टिक पिशव्या, अन्नकचरा, घाण पसरलेली असल्याने नागरिकांसह भाविकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. उघड्यावर साचलेला कचरा कुत्रे, डुकरे पसरवत असल्याने परिसरात दुर्गंधी आहे. आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पालिकेने दररोज कचरा संकलन करणे अपेक्षित असताना अनेक दिवस कचरा उचलला जात नसल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. तसेच काही बेजबाबदार नागरिकांकडूनही उघड्यावर कचरा टाकला जातो. अशा नागरिकांना समज देणे, नोटीस बजावणे व प्रसंगी दंडात्मक कारवाई करणे ही पालिकेची जबाबदारी आहे. मात्र, याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे.

केवळ कागदोपत्री योजना दाखवून शहर स्वच्छ होणार आहे का? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत. तात्काळ कचरा उचलून परिसर स्वच्छ करावा, नियमित स्वच्छता यंत्रणा राबवावी आणि दोषींवर कारवाई करावी.

## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

## चारचाकीच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : गलवाडे रस्त्यावरील स्वादिष्ट नमकीनजवळ चारचाकीने दुचाकीस जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार एकनाथ राजधर पाटील हे गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना गुरुवार, दि. ११ डिसेंबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास घडली. विकी पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून येथील पोलीस ठाण्यात रविवार, दि. १४ डिसेंबर रोजी अज्ञात चारचाकी चालकावर गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी सांगितले, की एकनाथ पाटील (वय ५७, रा. रघुराजस नगर, शिरूड नाका, अमळनेर) दुचाकीने (एमएच१९सीडी८३६७) रस्ता ओलांडत होते. यावेळी भरधाव येत असलेल्या चारचाकीने (एमएच१८बीसी९२०७) दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. यात एकनाथ पाटील हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर उपचार सुरू असून, प्रकृती स्थिर आहे.

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!

डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.

# वाघांची मोजणी कशी केली जाते?

## ९९ टक्के लोकांना माहिती नसेल नेमके कारण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जंगलात वाघांची गणना करणे ही केवळ पगमार्क पाहणे किंवा कॅमेरे बसवण्याइतकी सोपी पद्धत नाही. जंगलातील वाघ मोजण्याची प्रक्रिया काय आहे? चला जाणून घेऊया. राष्ट्रीय वाघ गणना म्हणजे 'ऑल इंडिया टायगर एस्टिमेशन' ही प्रक्रिया आहे, जी प्रत्येक चार वर्षांनी आयोजित केली जाते. ही जगातील सर्वात मोठी वन्यजीव सर्वेक्षण प्रक्रिया मानली जाते. या सर्वेक्षणात देशभरातील जंगलांमध्ये कॅमेरा ट्रॅप, पगमार्क, डीएनए सॅम्पल, ड्रोन आणि सॅटेलाइट तंत्रज्ञानाच्या मदतीने वाघांची संख्या, त्यांचे निवासस्थान आणि शिकार प्रजातींची स्थिती याचा सविस्तर डेटा गोळा केला जातो.

एनटीसीए आणि डब्ल्यूआयआय हे एकत्रितपणे याचे संचालन करतात. वाघ मोठ्या प्रमाणावर आढणारे राज्य मध्य प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र आणि उत्तराखंड यांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाते. २०२२ च्या राष्ट्रीय वाघ गणनेनुसार भारतात ३ हजार १६७ वाघ नोंदवले गेले होते.

२०२६ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय वाघ गणनेसाठी पीलीभीत टायगर रिझर्व्हमध्ये तयारीला वेग आला आहे. वन विभागाशी संबंधित लोकांना ही गुंतागुंतीची प्रक्रिया समजते. मात्र, साधारण लोकांना याबद्दल फारशी माहिती नसते. ही प्रक्रिया लोकगणनेप्रमाणे सोपी नसते. प्रत्यक्षात राष्ट्रीय वाघ संरक्षण प्राधिकरण दर चार वर्षांनी राष्ट्रीय पातळीवर वाघांची संख्या अंदाजे काढते, ज्याला सामान्य भाषेत 'वाघ गणना' म्हणतात. वाघांची गणना कशी होते? २०२२ मध्ये एनटीसीएने वाघ गणना केली होती. त्यामुळे २०२६ मध्ये ही प्रक्रिया पूर्ण होईल. मात्र, वाघांसह इतर वन्यजीवांची गणना करणे हे माणसांची गणना करण्याइतके सोपे नसते. ही अत्यंत क्लिष्ट प्रक्रिया असते. वाघांची गणना करताना घनदाट जंगलांमध्ये वाघ असण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी झाडांवर समोरासमोर दोन ट्रॅप कॅमेरे लावले जातात. या कॅमेऱ्यातील सेन्सर कोणत्याही वन्यजीवाच्या येताना- जातानाच्या वेळी त्याची छायाचित्रे टिपतात. नंतर ठराविक कालावधीत कॅमेऱ्यात कैद झालेल्या लाखो छायाचित्रांमधून फक्त वाघांची छायाचित्रे वेगळी केली जातात. वाघांच्या अंगावरील पट्टे हे मानवाच्या बोटांच्या ठश्याप्रमाणे युनिक असते. या पट्ट्यांच्या छायाचित्रांवरून तज्ज्ञ वाघांची संख्या अंदाजे काढतात. त्याच आधारावर कॅमेऱ्यात कैद झालेल्या इतर प्राण्यांचीही गणना केली जाते. पीटीआरमध्ये ७००

पेक्षा जास्त कॅमेरे लावले होते २०२२ च्या राष्ट्रीय वाघ गणनेत पीलीभीत टायगर रिझर्व्हला ३६५ ग्रिडमध्ये विभागले होते. प्रत्येक ग्रिड २ चौरस किलोमीटर क्षेत्र व्यापत होती. तर दुधवा टायगर रिझर्व्ह (दुधवा नॅशनल पार्क, कतरनियाघाट आणि किशनपूरसह) ८८७ ग्रिडमध्ये विभागले गेले होते. वाघांची छायाचित्रे घेण्यासाठी प्रत्येक ग्रिडमध्ये दोन कॅमेरा ट्रॅप लावले गेले. वाघांच्या शिकारीसाठी लागणाऱ्या विशेषतः मोठ्या खुर असलेल्या प्राण्यांचा अंदाज घेण्यासाठी दुधव्यात ११४ आणि पीटीआरमध्ये ५४ ट्रान्सेक्ट लाइन्स स्थापित केल्या होत्या.




# पुरणाच्या आरतीचे दिवे



आपल्या संस्कृतीमध्ये "दिवा" म्हणजे केवळ प्रकाश नव्हे, तो स्वयं परब्रह्माचा प्रतिरूप मानला जातो. सण, पूजा, उपासना, व्रत, आरती सगळीकडे दिवा ही अनिवार्य गोष्ट आहे. पण पुरणाच्या आरतीचा दिवा हा सात्त्विकता, तृप्ती आणि पूर्णत्व यांचा दिव्य संगम आहे.

पुरण म्हणजे "पूर्णत्व".
आरती म्हणजे "प्रकाशाचा अर्जुनाभिमुख वर्तुळ". दिवा म्हणजे "अज्ञान नष्ट करणारा साक्षात अग्नी-तेज".
यांचा मिळून एकत्र होणारा योग म्हणजेच "पुरण-दीप-आराधना".

**१) अग्नी आणि दिव्याचे तात्त्विक स्थान**

शास्त्रानुसार (अ) वेदांत तत्त्वज्ञान ऋग्वेदामध्ये अग्नीला प्रथम आवाहन केले आहे.
**"अग्निमीळे पुरोहितं"**
**अर्थ :** अग्नी हा देवांचा पुरोहित आहे; मानवी आणि दैवी जग यांना जोडणारा दुवा आहे.
अग्नी म्हणजे ऋत, सत्य आणि तपश्चर्येचा मूळ आधार.
तैत्तिरीय ब्राह्मण म्हणतेः
**"अग्निर्देवतानां मुखम्"**
दिवा (अग्नी) म्हणजे देवतांचे मुख. म्हणून पुरणाच्या आरतीतला दिवा देवतेला "मुखारविंदातून" अर्पण केलेला तेज आहे.

**२) पुरणाचा दिवा सत्त्वगुणाचे प्रतीक (सांख्य-दर्शन)**

सांख्य-दर्शनानुसार तीन गुण
सत्त्व, रज, तम हे या मानवी मनाचे आधार आहेत.
पुरण हा सत्त्वगुणाचा प्रतीक मानला जातो.
शुद्धता
तृप्ती
प्रेम
संतुलन
सात्त्विकता
म्हणून पुरणाच्या दिव्याचा प्रकाश मनातील सत्त्वगुण वाढवतो. जे आध्यात्मिक प्रगतीसाठी अनिवार्य आहे.

**३) आरतीचा दिवा पंचप्राणांचा जागर (उपनिषदांनुसार)**

**प्रश्नोपनिषद सांगते :**
"प्राणो हि जीवनं"
प्राण म्हणजे जीवन.
दिव्याच्या ज्वाळेला पंचप्राणांशी जोडले जाते.
१. प्राण चेतनेचा उगम
२. अपान शुद्धी व विसर्जन
३. समान पचन, संतुलन
४. उदान उत्साह, उन्नती
५. व्याना संचार, प्रसरण
आरती फिरविताना दिव्याच्या प्रकाशात हे पंचप्राण जागृत होतात. म्हणून पुरणाच्या दिव्याची आरती म्हणजे शरीरातील प्राणशक्तीचे दिव्य पुनरुज्जीवन.

**४) पुरण तयार करण्याचे आध्यात्मिक महत्त्व (पूरणा = पूर्णता)**

पुरण बनविणे ही प्रक्रिया श्रम, प्रेम, सात्त्विकता, काळजी, शिस्त यांचा सुंदर संगम आहे.
भागवत पुराण सांगते :
**"कार्यं यद् भक्तिपूर्वकम्"**
भावपूर्वक केलेले घरातील कामही उपासनेइतकेच पवित्र.
पुरण तयार करताना आईचे हृदय, घरातील संस्कार आणि श्रम तिच्यात मिसळतात.
म्हणून पूरणाच्या दिव्याची आरती म्हणजे "घरातील पूर्णत्व देवाला अर्पण करणे.

**५) दिव्याचा प्रकाश जडता आणि अज्ञानाचा नाश**

**श्रीमद्भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण म्हणतात :**
**"अहं अग्नि"**
मी अग्निरूप आहे.
दिवा म्हणजे
अज्ञानाचा नाश
नकारात्मकतेचे शमन
अंतःकरणाचे शुद्धीकरण
अहंकाराचा दहन
**गीता सांगते :**
"ज्ञानदीपेन भास्वता"
ज्ञानाचा दिवा अंधार दूर करतो.
पुरणाचा दिवा म्हणजे
ज्ञान + तृप्ती + शुद्धता यांचे रुपांतरित तेज.

**६) पुरणाचा दिवा पंचमहाभूतांचे संतुलन (तैत्तिरीय उपनिषद)**

तैत्तिरीय उपनिषदात पंचमहाभूतांना मानव-कोशाशी जोडले आहेः
१. पृथ्वी अन्न, पुरण
२. जल शुद्धता
३. अग्नी दिवा
४. वायु प्राण
५. आकाश श्रद्धेचे क्षेत्र
पुरणआरती हा पाचही महाभूतांचा सामंजस्ययोग आहे.
याला म्हणतात
"भूतशुद्धीचा दिव्यक्रम."

**७) स्वतःभोवती आरती फिरविणे**

आत्मप्रकाशाची साधना
**आरतीच्या वर्तुळाचा अर्थ :**
जीवनाचा अखंड प्रवाह.
आरती फिरविताना मन म्हणते
"अंधार माझ्यात आहे
प्रकाश तुझ्यात आहे.
हे देवा, तुझा प्रकाश माझ्यात उतरू दे." यालाच 'आत्मदीप योग' म्हणतात.

**८) पुरणाच्या दिव्याचा खरा संदेश शास्त्रनिवेदन**

शास्त्रे सांगतात
"दीपो भक्तस्य हृदयम् "
दिवा म्हणजे भक्ताच्या हृदयाचे रूप. पुरणाचा दिवा म्हणजे पूर्ण हृदयाने देवाला अर्पण केलेली भक्ती.
**तो संदेश देतो :** तृप्तीतूनच भक्ती उदयास येते शांततेतूनच देव अनुभवाला येतो प्रकाशातूनच सत्यप्राप्ती होते
पूर्णत्वातूनच कृपा मिळते

**९) निष्कर्ष :** पुरणाचा दिवा म्हणजे 'पूर्णत्वाचा दीपयोग'
पुरण + दिवा + आरती + भक्ती = पूर्णत्व, तृप्ती, मनशुद्धी, आणि देवकृपा. हा दिवा सांगतो
"घरात आणि मनात जे काही आहे ते पूर्ण मनाने अर्पण करा. पूर्णत्व दिले की देव पूर्ण कृपा देतो." पुरणाचा दिवा म्हणजे आत्मतृप्ती, भक्ती आणि ज्ञान यांचे एकत्रित तेज.

# खाटू शाम यांचे खान्देश कनेक्शन...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राजस्थानमधील खाटू शाम या देवांचे महत्त्व सध्या खूप गाजत आहे. हारे का सहारा म्हणजे पराभूतांचा आधार आहे हा खाटू शाम बाबा. खान्देशातून रोज गाड्या भरभरून स्त्रिया-पुरुष या ठिकाणी येत आहेत. ते शाम बाबा कोण आहेत?

राजस्थानातील सीकर जिल्ह्यात खाटू हे गाव आहे. या ठिकाणी शाम बाबा नावाचे जागृत देवस्थान आहे. खाटू गावावरून या देवाला खाटू शाम म्हणतात. या शाम बाबांची कथा थेट महाभारत काळातील आहे. या शाम बाबांचा खान्देशशी काय संबंध आहे ते आपण बघूया.

दुर्योधनाने पांडवांना लाक्षागृहात जाळून मारण्याचा कट केला होता. पण ते भुयारमार्गातून बाहेर पडून थेट खांडवनात मुक्कामाला राहिले. त्या काळातील खांडव वन म्हणजे आजचे खान्देश आहे. त्या काळातील एक चक्रानगरी म्हणजे आजचे एरंडोल. या एरंडोलमध्ये पांडवांनी वास्तव्य केले होते. एरंडोल येथे येण्यापूर्वी ते जरंडी गावाशेजारील जंजाळा किल्ला (ता. सोयगाव) येथे गेले. तेथे हिडंबा आणि भीम यांचा प्रेमविवाह झाला. हे सर्व तुम्हाला माहिती आहे. या जंजाळा किल्ल्याची राणी होती हिडिंबा. भीम-हिडिंबा यांना एक पुत्र झाला तो म्हणजे घटोत्कच.



मुरासूर नावाचा एक राक्षस होता. त्याची कन्या अहिलावती आणि घटोत्कच यांचा विवाह झाला. त्यांना तीन पुत्र झाले. त्यांची नावे बर्बरिक, मेघवर्ण आणि अंजनपर्व. मेघवर्ण महाभारत युद्धात कर्णाच्या हातून मारला गेला. अंजनपर्व हा नंतर जंजाळ किल्ल्याचा राजा झाला. त्याच्या नावावरून जरंडी जंजाळाजवळ झेंडेअंजन नावाचे गाव आहे. तर असे हे सर्व कुटुंब आपल्या खान्देशातील आहे. सोयगाव तालुका हा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आहे. पण तो अहिराणी भाषिक तालुका चाळीसगावला लागून आहे. भाषिक, सांस्कृतिक आणि भौगोलिकदृष्ट्या सोयगाव तालुका खान्देशचा भाग आहे.

बर्बरिक हेच खाटू शाम आहेत. ते खान्देश पुत्र बर्बरिक अत्यंत शक्तिशाली आणि शिवभक्त होते. त्यांनी भगवान शिव आणि काली यांची घोर तपश्चर्या केली तेव्हा भगवान शिव यांनी त्यांना तीन शक्तिशाली बाण दिले होते. ज्याने ते एकाच वेळी स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ नष्ट करू शकत होते. त्यांची आई अहिलावती अत्यंत दयाळू होती. तिने बर्बरिक यांना सांगितले, की ' बेटा तू तुझ्या शक्तीचा वापर गोरगरीब-दीनदुबळ्यांसाठी कर.' त्यावर बर्बरिक यांनी आईला वचन देत प्रतिज्ञा केली, की मी नेहमी हारणाऱ्यांच्या बाजूने युद्ध करीन.

कौरव-पांडव यांच्यात महाभारत युद्ध सुरू झाल्यावर बर्बरिक त्या युद्धात भाग घ्यायला खान्देशातून कुरुक्षेत्राकडे निघाले. तेव्हा भगवान श्रीकृष्ण यांना चिंता पडली की बर्बरिक अत्यंत बलवान योद्धा आहेत. त्यांना कोणीही हरवू शकणार नाही. ते मात्र सर्वांना हरवू शकतात. त्यांच्या प्रतिज्ञेप्रमाणे ते हारणाऱ्यांच्या बाजूने लढणार हे ठरले होते. त्यातूनच अनर्थ होणार होता. कारण युद्धात पांडव हरायला लागले, तर बर्बरिक पांडवांच्या बाजूने लढले असते आणि कौरव सेना कापून काढली असती. त्यामुळे कौरव हरायला लागले असते. कौरव हारत आहेत, असे बघता बर्बरिक पांडवांची बाजू सोडून कौरवांच्या बाजूने लढायला लागले असते आणि त्यांनी पांडव सेना कापून काढली असती. ते कौरवांच्या बाजूने लढायला लागल्यावर पुन्हा पांडव हरायला लागले असते. मग त्यांनी पुन्हा पांडवांच्या बाजूने लढत कौरव कापून काढले असते. असे करत-करत दोन्ही बाजूंचे सैन्य संपले असते आणि शेवटी एकटे बर्बरिक जीवंत राहिले असते.

हा अनर्थ टाळण्यासाठी भगवान श्रीकृष्ण यांनी ब्राह्मण वेष घेऊन त्यांना रस्त्यात गाठले. त्यांची भेट एका पिंपळवृक्षाजवळ झाली. भगवान श्रीकृष्ण यांना बर्बरिकच्या सामर्थ्याची परीक्षा घ्यावी, असे वाटले. त्यांनी बर्बरिक यांना सांगितले, की मी तुझ्या तीन बाणांचे सामर्थ्य जाणून आहे. त्याचे प्रात्यक्षिक मला करून दाखव. त्यावर बर्बरिक म्हणाले, की काय करू सांगा. त्यावर भगवान श्रीकृष्ण म्हणाले, की तू या पिंपळ वृक्षाच्या सर्व पानांचा भेद एका बाणात करू शकतोस? तसा बर्बरिक यांनी धनुष्यावर बाण लावून सोडला तसा त्या बाणाने एका क्षणात पिंपळ वृक्षाच्या प्रत्येक पानाच्या मधोमध छेद करून भगवान श्रीकृष्णांच्या पायाभोवती घिरट्या घालायला लागला. तसे बर्बरिक जोरात ओरडले, की महाराज पाय बाजूला करा. तुमच्या पायाखाली पिंपळ वृक्षाचे पान आहे. पाय बाजूला केला नाही, तर तुमचा पाय भेदून बाण पान छेदेल. भगवान श्रीकृष्ण यांनी पाय बाजूला करताच बाणाने पानाचा वेध घेतला.

असा धनुर्धर भगवान श्रीकृष्णांनी सुद्धा पाहिला नव्हता. पुढचा अनर्थ टाळण्यासाठी भगवान श्रीकृष्ण यांनी त्यांच्याकडून त्यांचे शीर दान म्हणून मागून घेतले. बर्बरिककडे दिव्य शक्ती होती. त्यांनी ओळखले हा ब्राह्मण दुसरा-तिसरा कोणी नसून आपले आजोबा भगवान श्रीकृष्ण आहेत. तेव्हा बर्बरिक यांनी क्षणाचाही विलंब न करता त्यांचे शीर कापून दिले. पण शीर देण्याआधी त्यांनी भगवान श्रीकृष्ण यांच्याकडे एक इच्छा बोलून दाखविली. ते म्हणाले, की मला संपूर्ण महाभारत युद्ध पाहायचे आहे. तेव्हा भगवान श्रीकृष्ण यांनी त्यांचे ते शीर कुरुक्षेत्रावर एका उंच टेकडीवर बर्बरिकच्याच तीन बाणांच्या टोकावर ठेवून दिले. त्यावेळी भगवान श्रीकृष्ण यांनी त्यांना वर दिला. ' बर्बरिक बाळा धन्य आहेस तू. कलियुगात तुझी माझ्याच ' शाम ' या नावाने लोक पूजा करतील आणि तू हारणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा सहारा होऊन त्यांचे दुःख निवारण करशील.'

ज्याने संपूर्ण महाभारत युद्ध डोळ्यांनी पाहिले तेच हे बर्बरिक. युद्ध संपल्यावर भगवान श्रीकृष्ण यांनी त्यांचे अंतिम क्रियाकर्म करून ते शीर रूपमती नदीत सोडून दिले. ते वाहत राजस्थाच्या सीकर जिल्ह्यात एका खाटू नावाच्या गावात पोहोचल. तेथे ते कित्येक वर्षे मातीत रुतून बसले. त्या खाटू गावाच्या नावावरून खाटू आणि भगवान श्रीकृष्ण यांच्या नावावरून शाम असे ' खाटू शाम ' नावाने बर्बरिक कलियुगात प्रसिद्ध झाले. हारणाऱ्यांचे सहारा झाले.

या मंदिराबाबत असे सांगतात, की हे एक हजार वर्षांपेक्षा अधिक जुने मंदिर आहे. हे शीर घडीव दगडी मूर्ती आहे. पण ते स्वयंभू आहे. वाहत आलेले शीर जेथे जमिनीखाली पुरले गेले होते त्या जागेवर येऊन एक गाय दुधाच्या धारा सोडायची. गावकऱ्यांना तो शुभ संकेत वाटला आणि त्यांनी तेथे खुदाई केली. त्यात बर्बरिक यांचे शीर मिळाले. भगवान श्रीकृष्णांच्या मिळालेल्या वरानुसार त्यांना लोक शाम बाबा म्हणतात. ते नवसाला पावतात. त्यांचे अनेक चमत्कार भक्तांनी पाहिले आहेत.

बर्बरिक यांचे धड तेथेच कुरुक्षेत्रात म्हणजे आजच्या हरियाणातील हिस्सार जिल्ह्यातील स्याहडवा गावातील एका मंदिरात पूजले जाते. त्यालाही लोक खाटू शामच म्हणतात.

धुळे जिल्ह्यातील शिदखेडा तालुक्यात कुरूकवाडे नावाचे एक गाव आहे. या गावातही खाटू शाम बाबांचे मंदिर आहे. खाटू गावातील मूर्तीसारखीच ही मूर्ती आहे. याबाबत जास्त माहिती उपलब्ध नाही. हे मंदिर कधी बांधले तेही माहीत नाही. मात्र मंदिर आणि मूर्ती छान आहे. ज्यांना राजस्थानमध्ये जाणे शक्य नाही ते लोक येथे दर्शनाला येतात.

**जय खाटू शाम बाबा, जय जरंडी, जय जंजाळा किल्ला, जय खाटू, जय कुरूकवाडे, जय खान्देश..!**

# तिरुपती बालाजी येथे केशदानाचे रहस्य... कुबेरांचे कर्ज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय संस्कृती आणि तीर्थाटनाची परंपरा पाहिली, की एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. ती म्हणजे येथे श्रद्धेला तर्कापेक्षा जास्त महत्त्व आहे. तिरुमलाच्या त्या पवित्र सात टेकड्यांवर पाऊल ठेवले की कानावर पडणारा ' गोविंदा... गोविंदा...' हा गजर आणि समोर दिसणारा अथांग जनसागर पाहून मन थक्क होते. या अथांग गर्दीत एक गोष्ट सर्वांचे लक्ष वेधून घेते, ती म्हणजे लहानांपासून थोरांपर्यंत आणि विशेषतः दाक्षिणात्य स्त्रियांचेही मुंडन केलेले चेहरे. तिरुपती बालाजींच्या दर्शनाइतकेच महत्त्व तेथे ' केशदान ' करण्याला आहे. पण कधी विचार केला आहे, की आपण तेथे केस का देतो? यामागील नक्की काय कारण आहे?

या प्रथेमागे एक अत्यंत रंजक आणि आपल्या संस्कृतीची पौराणिक कथा आहे. ही कथा आपल्याला थेट भगवान विष्णूंचे अवतार असलेल्या श्रीनिवास (वेंकटेश) आणि माता पद्मावती यांच्या विवाह सोहळ्याकडे घेऊन जाते. पौराणिक संदर्भांनुसार जेव्हा भगवान श्रीनिवासांनी माता पद्मावतीशी विवाह करण्याचे निश्चित केले तेव्हा हा विवाह सोहळा त्रिभुवन पालकाला साजेसा असावा, अशी इच्छा होती. मात्र पृथ्वीवर मानवी रूपात असलेल्या भगवंतांकडे विवाहासाठी आवश्यक तेवढे धन नव्हते. अखेर या भव्य सोहळ्यासाठी भगवान श्रीनिवासांनी धनाची देवता कुबेर यांच्याकडे मदत मागितली. कुबेर यांनी कर्ज दिले, पण एका अटीवर हे कर्ज व्याजासह फेडावे लागेल आणि जोपर्यंत हे कर्ज फिटत नाही तोपर्यंत भगवान वेंकटेश कलियुगाच्या अंतापर्यंत पृथ्वीवरच वास्तव्य करतील. अशी श्रद्धा आहे, की भगवान



अजूनही कुबेर यांचे ते कर्ज फेडत आहेत.

जेव्हा भक्त मंदिरात येतात आणि हुंडीमध्ये धन अर्पण करतात किंवा मौल्यवान वस्तू देतात. तर यात ' केस 'दानाचा संबंध काय? त्यामागेही एक हृदयस्पर्शी कथा आहे. एकदा भगवान विष्णूंच्या डोक्यावरचा काही भाग दुखावला गेला आणि तेथील केस गळाले. हे पाहून गंधर्व कन्या असलेल्या ' नीला देवी ' यांनी क्षणाचाही विचार न करता आपल्या रेशमी केसांचा बटा कापला आणि तो भगवंताच्या त्या जागी लावला. त्यांचे हे समर्पण आणि त्याग पाहून भगवान प्रसन्न झाले. त्यांनी वरदान दिले, की ' केस हे मानवाच्या सौंदर्याचे प्रतीक आहेत. परंतु माझ्यासाठी जो कोणी या सौंदर्याचा आणि पर्यायाने आपल्या अहंकाराचा त्याग करेल त्याचे अर्पण मला सर्वांत प्रिय असेल. हे केस स्वीकारून मी भक्तांच्या इच्छा पूर्ण करेन.' यामुळेच अशी एक दृढ समजूत भक्तांमध्ये आहे, की आपण जेवढ्या किमतीचे किंवा सौंदर्याचे केस दान करतो त्यापेक्षा कैक पटीने वेंकटेश आपल्याला ऐश्वर्य आणि सुख-शांती परत मिळवून देतात. येथे केवळ देवाण-घेवाणीचा व्यवहार नाही, तर ती भक्ताची आपल्या ईश्वराप्रती असणारी श्रद्धा आहे. खरेतर केस हे आपल्या सौंदर्याचे आणि पर्यायाने आपल्या ' अहंकाराचे ' लक्षण मानले जातात. जेव्हा एखादा भक्त कल्याण कट्टा येथे जाऊन मुंडन करतो तेव्हा तो केवळ केस कापत नसतो, तर तो आपला ' मी 'पणा, अहंकार भगवंताच्या चरणी अर्पण करत असतो. श्रीमंत असो वा गरीब, मुंडन केल्यानंतर तेथे सर्वजण सारखेच दिसतात. ही समानता म्हणजे खऱ्या अर्थाने ईश्वरापुढील शरणागती.

आता प्रश्न उरतो तो म्हणजे केस दान करावे की नाही? हा ज्याचा त्याचा श्रद्धेचा आणि सोयीचा प्रश्न आहे. तिरुपतीला गेल्यावर त्या वातावरणातील दिव्यतेमुळे अनेकदा आपण भारावून जातो. त्या भागातील अगदी स्थानिक स्त्रियाही, ज्यांच्यासाठी केस हे दागिन्यापेक्षा कमी नाहीत, त्या अतिशय आनंदाने संपूर्ण केशदान करतात. अनेकदा आपणही सुरूवातीला उत्साहाने किंवा नवस फेडण्यासाठी पूर्ण केस दान करतो. ते केल्यावर मिळणारे मानसिक समाधान नक्कीच वेगळे असते. ते शब्दांत मांडता येत नाही. परंतु व्यावहारिक अडचणींमुळे किंवा वैयक्तिक कारणांमुळे प्रत्येकालाच प्रत्येक वेळी पूर्ण मुंडन करणे शक्य होते असे नाही. अशा वेळी शास्त्राचा आणि परंपरेचा मान राखून अनेक भक्त आजकाल ' मोजके केस ' (काही बट) कापून प्रतिकात्मक दान करतात. शेवटी भगवंताला तुमच्या केसांच्या संख्येपेक्षा तुमच्या मनातील भाव जास्त महत्त्वाचा असतो. त्यामुळे तुम्ही पूर्ण केस दान करा किंवा प्रतिकात्मक स्वरूपात थोडे केस अर्पण करा. जर मनात संपूर्ण शरणागती आणि भक्ती असेल, तर ते दान वेंकटेशाला पोहोचतेच. वेंकटेशाची ही कथा आपल्याला हेच शिकवते, की आपण ईश्वराकडून जे काही घेतो त्याची परतफेड त्यागाच्या भावनेतून करणे हेच आपले कर्तव्य आहे.

# तिरुमलातील श्री वेंकटेश्वरांचा दिव्य अवतार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तिरुपतींच्या पवित्र सप्तगिरी पर्वतांवर भगवान विष्णू यांनी भक्तकल्याणासाठी वेंकटेश्वर या दिव्य स्वरूपात अवतार घेतला, अशी पुराणकथा सांगितली जाते. एकदा ऋषी भृगू यांनी त्रिमूर्तींची परीक्षा घेण्याचा संकल्प केला. ब्रह्मा आणि महादेवांकडून अपेक्षित आदर न मिळाल्याने भृगू रुष्ट झाले. अखेर ते वैकुंठात गेले आणि भगवान विष्णू ध्यानात मग्न असल्याने त्यांनी त्यांच्या छातीवर पायाने प्रहार केला.



विष्णूंनी मात्र क्रोध न करता अत्यंत शांतपणे त्या परीक्षेला स्वीकारले. हा अपमान लक्ष्मीदेवींच्या मनाला अत्यंत वेदनादायक ठरला. कारण त्या नेहमीच भगवान विष्णूंच्या हृदयात वास करतात. त्या संतापून वैकुंठ सोडून पृथ्वीलोकावर अवतरल्या. आपल्या प्रेयसीला शोधण्यासाठी आणि पृथ्वीवरील जीवांचे रक्षण करण्यासाठी भगवान विष्णूंनीही अवतार घेण्याचा संकल्प केला. अशाप्रकारे भगवान विष्णूंनी वेंकटाचल पर्वतावर वेंकटेश्वर या रूपात प्रकट होऊन तिरुमला येथे स्थायिक झाले. त्यांच्या दिव्य मूर्तीला स्वयंभू मानले जाते. म्हणजेच ती मूर्ती स्वतः प्रकट झाल्याचा दृढविश्वास आहे. आजही लाखो भक्त तिरुमलाच्या पवित्र डोंगरावर चढत एकाच भावनेने त्यांच्या चरणी नतमस्तक होतात.

' प्रभू, आमच्यावर कृपा करा, आमची श्रद्धा, आमचे मन, आमचे आयुष्य तुमच्याच चरणी अर्पण. '
तेथील प्रत्येक वारा भक्तीने भारलेला, प्रत्येक घंटानादात अध्यात्म दुमदुमते आणि प्रत्येक भक्ताच्या ओठांवर केवळ एकच मंत्र

**गोविंदा, गोविंदा!**
**गोविंदा, गोविंदा!**

# उपासनेसाठी देवता कोणती असावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील प्रचंड संख्येने असलेल्या देव-देवता व साधूपुरुष पाहून नेमकी कोणती देवता उपासनेला घ्यावी वा कोणत्या संतांचा मार्ग अनुसरावा, हे काही कळेनासे होते. त्याबाबत नेमकी भूमिका कोणती असावी?

जी गोष्ट देव-देवतांची तीच विविध संत-साधूपुरुषांची असते. वर्तमानकाळातील सत्पुरुषाची कास धरताना व त्याला गुरूपद बहाल करताना एक गोष्ट मनोमन लक्षात ठेवली पाहिजे, की गुरूपद ही परिभाषा मोक्षगुरूच्या बाबतीत नसते, तर ती लौकिक गुरूच्या बाबतीत असते. गुरूचे शिक्षागुरू, दीक्षागुरू व मोक्षगुरू असे तीन प्रकार आहेत. शिक्षागुरू म्हणजे विविध प्रकारचे ज्ञान देणारे गुरू होत. आई हा पहिला शिक्षागुरू ठरतो. त्यानंतर शाळा, महाविद्यालयांतून अभ्यासाचे मार्गदर्शन करणारे गुरू हे शिक्षागुरू होत. शिक्षागुरूची निवड साधकाच्या हाती असते. मात्र शिक्षागुरूचे त्या-त्या शाखेबाबतीतील ज्ञान



व शिक्षण कितीही आदर्श असले, तरी त्याच्या सर्वच गोष्टी आदर्श असतीलच असे नाही. काही वेळा आपल्या श्रद्धेला तडा जाण्याइतपत व आदर्शाची पायमल्ली होण्याइतपत शिक्षागुरूमध्ये न्यून व दोष असू शकतात. पण तरीही शिक्षागुरूचा अवमान न करता योग्य मानमर्यादा ठेवावी. त्याचे श्रवण सदैव बाळगावे. गुरूचा दुसरा प्रकार म्हणजे दीक्षागुरू होय. दीक्षागुरू हे अध्यात्म, परमार्थ व योगातील विविध अंगोपांगांचे शिक्षण देऊन दीक्षाही देतात. कोणी सोऽहं साधनेची तर कोणी क्रियायोगाची, कोणी योगासनाची तर कोणी शक्तिपाताची, कोणी वेदमंत्रांची तर कोणी सप्तशतीची, कोणी तंत्रातील मंत्राची तर कोणी रेकीची, कोणी मोहनिद्रेची तर कोणी प्रक्षेपणाची, कोणी किमयेची तर कोणी गायनाची दीक्षा देतील. हे दीक्षागुरू सर्वथैव वंद्य असेच असतात. त्यांच्यात काही न्यूनता आढळून आली वा आचरणात ढिलेपणा दिसला तरी तेवढा भाग वगळून मुख्य दीक्षा मनापासून घ्यावी.

दीक्षागुरूंचेही ऋण सदैव मनी बाळगावे. त्यांचा योग्य आदर-सत्कार जरूर करावा. पण त्याचा अतिरेक होता कामा नये. काही दीक्षागुरू आपल्या शिष्यांना मोहजालात टाकतात. त्यांच्याकडून द्रव्यहरण करू पाहतात. अशा वेळी शिष्यांनी सदैव जागरूक राहून अशा अनर्थाला बळीही जाऊ नये व गुरूनिंदा करून दीक्षेचा अनादरही करू नये. कारण गुरूमध्ये न्यूनता असू शकते, पण दीक्षेत कधीच दोष नसतात. दीक्षेचे रहस्य समजावून घेऊन ती पूर्ण व शुद्ध स्वरूपात आपल्या अंगी बाणेल याविषयी सदैव जागरूक असावे.

गुरूचा तिसरा प्रकार म्हणजे मोक्षगुरू होय. शिक्षागुरू व दीक्षागुरू हे शिष्याने शोधायचे असतात. पण याउलट मोक्षगुरू स्वतः शिष्याचा शोध घेत येतो. आई-वडील, आप्तमंडळी, शिक्षागुरू व दीक्षागुरू यांनी दिलेल्या ज्ञानाचा साठा व साधकाने स्वतः केलेली साधना, उपासना, आचारपालन इत्यादी गोष्टींचा संकलित परिणाम होऊन तो मोक्षास पात्र ठरतो. तेव्हा तो कृपाळू परब्रह्मस्वरूपी सर्वज्ञ मोक्षगुरू स्वतःहून त्या शिष्याचा शोध घेत येतो व शिष्याच्या मस्तकावर उजवा हात ठेवून त्याच्या उजव्या कानात प्रणवाचा उच्चार करतो. तो उच्चार श्रवण करताच साधकास सर्वत्र एकत्वाची अनुभूती येते व द्वैतबुद्धी नष्ट होती. मग तो सदैव ब्रह्मानंदातच लीन राहतो. देहाकडून प्रापंचिक कार्ये कशी होतात, हेही त्याच्या गावी नसते. कारण त्याचा अहंभाव नष्ट होऊन तो सदैव ' हे विश्वची माझे घर ' या बुद्धीत लीन असतो.